# आमच्या आयुष्यातील काही आठवणी

श्रीमती रमाबाई रानडे

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**आमच्या आयुष्यातील काही आठवणी/रमाबाई रानडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८ ई वॉर्ड, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१२

**किंमत**
रुपये २५०/-

आमच्या आयुष्यांतील काही आठवणी.

अथवा

स्वतःसंबंधी काही गोष्टी

पवित्र होईन चरित्र उच्चारे। रूपाच्या आधारे गोजरीया ।।
अपुरती बुद्धि पुण्य नाही गांठी। पायी घाली मिठी वाहे डोळा ।।
गाईन ओविया शिष्टांच्या आधारे। सारीन विचारे आयुष्या या।।
तुका म्हणे तुझे नाम नारायणा । ठेवीन मी मना आपुलिया ।।१।।

– तुकाराम

# अनुक्रमणिका


भाग १ : पूर्वजांचे वृत्त व स्वतःचे बालपण / ५
भाग २ : मुंबईस विद्याभ्यास व आरंभीची नोकरी / १४
भाग ३ : माझे लग्न / २४
भाग ४ : दयानंदसरस्वती यांचे पुण्यास आगमन / ५१
भाग ५ : नाशिकास बदली / ५५
भाग ६ : धुळे, सन १८७९-८० / ६७
भाग ७ : सन १८८१ / ७६
भाग ८ : पहिली स्वारी / ८१
भाग ९ : पंडिता रमाबाईंचे पुण्यास आगमन व आर्यमहिला समाजाची स्थापना / ८५
भाग १० : स्वारी दुसरी, १८८२-१८८३ / ९७
भाग ११ : एक विद्यार्थी / १०७
भाग १२ : स्पेशल जज्जाच्या जागेवर बदली दुसरी स्वारी / ११३
भाग १३ : तपकिरीची डबी हरवली ! / ११५
भाग १४ : अनसूयाबाईंचे पुराण / ११८
भाग १५ : फायनॅन्स कमिटीकडे नेमणूक / १२५
भाग १६ : कलकत्त्याची स्वारी, ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर अखेर / १४३
भाग १७ : करमाळ्याचे दुखणे / १५०
भाग १८ : पाच हौद मिशनमधील चहा प्रकरण व ग्रामण्य / १६१
भाग १९ : सोलापूरचे दुखणे / १७२
भाग २० : आजारी माणसाची काळजी / १८८
भाग २१ : सन १८९९, महाबळेश्वरची स्वारी / २१४
भाग २२ : सन १९००, सप्टेंबर महिना / २३४

भाग १ला

# पूर्वजांचे वृत्त व स्वतःचे बालपण

## मूळ ठिकाण

आमच्या पूर्वजांचे (रानड्यांचे) मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण तालुक्यात गुहानगरानजीक मोभारपाचेरी ऊर्फ पाचेरिसडा या नावाचे आहे. त्या गावी या घराण्याचे वंशज असून त्यांच्याकडे खोतीचे उत्पन्न अद्याप चालू आहे. तेथून भगवंतराव नावाचे पुरुष (**स्वतः**चे निपणजे) कोकणातून देशात पंढरपुराजवळ कसबे करकंब येथे येऊन राहिले. हे जरी गृहस्थ होते, तरी त्यांना ज्योतिष फार चांगले येत होते. त्यांनी एकदा नाना फडनविसास त्यांच्याविषयी जे जे भविष्य सांगितले होते, ते ते घडून आले असे म्हणतात.

## अपत्यासाठी कृष्णाबाईचे खडतर व्रताचरण

भगवंतराव यांचे चिरंजीव भास्करराव ऊर्फ अप्पाजी हे आपल्या आईच्या पुष्कळ अपत्यांतून एकटेच वाचले. ते केवळ आपल्या आईच्या (कृष्णाबाईंच्या) सतत बारा वर्षे अत्यंत निष्ठापूर्वक व खडतर व्रताचरण करण्यानेच वाचले. कृष्णाबाईंची मुले वाचत नव्हती, म्हणून त्यांनी सतत बारा वर्षे अश्वत्थाला व गाईला प्रदक्षिणा घातल्या व त्या कालात गाईच्या गोमुत्रात दशमी करून तीच खाऊन राहिल्या; त्यांनी दुसरा आहार घेतला नाही. त्या भाविक व सात्त्विक वृत्तीच्या होत्या. अतिथी, अभ्यागत कोणत्याही वेळी आपल्या घरी आला असता, न कंटाळता आधी उठून त्याला स्वयंपाक करून जेऊ घालीत आणि अश्वत्थ वृक्षाला हेच मागणे मागत की, मला पुत्र होऊन त्याची पाळेमुळे तुझ्यासारखी खोल जावीत व विस्तारही

तुझ्यासारखाच मोठा होऊन त्याची बहुतांना छाया मिळावी. त्या त्यांच्या मागण्याप्रमाणे, देवाने भास्करराव अप्पांना पूर्णायू करून, भाग्यवान् व पराक्रमी केले; आणि एकाचे एकवीस ह्या म्हणीप्रमाणे त्यांचा वेलविस्तार मोठा वाढून उत्तरोत्तर रानडे घराण्यातील सर्व पुरुष बुद्धिमान, शूर, पराक्रमी, उद्योगी, उंच व बांध्याने मजबूत, तसेच मनाचे उदार असेच निपजले. हे त्या महासाध्वीच्या पुण्याईचे फळ आहे, असे म्हटले पाहिजे.

### दीर्घायुषी, प्रामाणिक, हुषार अप्पाजी भगवंत

अप्पाजी भगवंत हे वर सांगितलेल्या साध्वीचे एकुलते एक पुत्र व **स्वतःचे** सख्खे पणजे होत. सांगली संस्थानचे अधिपती प्रख्यात चिंतामणराव ऊर्फ अप्पासाहेब पटवर्धन यांच्याजवळ ते प्रथम कारकून होते. पटवर्धनी सैन्यातील एका तुकडीचे प्रमुखत्व एके काळी त्यांच्याकडे होते. त्यांनी एकदा मोंगलांशी लढून एक किल्ला सर केला व त्या वेळी लुटीत जो माल आला, त्यापैकी ह्यांनी कशालाही स्पर्श केला नाही, असे सांगतात. मग आपल्या गुणांनी वाढत वाढत जाऊन श्री. अप्पासाहेब यांजकडून इंग्लिश सरकाराकडे ते वकील होते.

कोणत्याही गोष्टीत भीड न धरिता, आपल्या बुद्धीला शुद्ध व खरी वाटेल तशी ते आपल्या मालकाला सल्ला देत. तेवढ्यापुरती मालकाची थोडी नाराजी झाली तरी ते भीत नसत. प्रामाणिकपणा व बुद्धिमत्ता, या दोन गुणांबद्दल पटवर्धनांची त्यांच्यावर बहाल मर्जी असे. त्यांनी वंशपरंपरेने यांना जी तैनात करून दिली आहे, ती अद्यापी सांगलीतील आमच्या घराण्याकडे चालत आहे.

श्रीचिदंबरस्वामी म्हणून जे कर्नाटक प्रांतात प्रसिद्धीस आले होते, ते आमच्या अप्पांचे गुरू होते. अप्पांना आपला मरणकाळ माहीत होता, असे म्हणतात. मरणाच्या पूर्वी सहा महिने अगोदरपर्यंत, ते मोठ्या घोड्यावर चटकन् बसत असत. दात व इतर गात्रे शेवटपर्यंत शाबूद होती. ते आपला सर्व वेळ ईश्वरध्यानात व चिंतनात घालवीत, व मुखाने नामस्मरण करीत. ते आपल्या वयाच्या पंचाण्णवाव्या वर्षी मुखाने नामस्मरण करीत बसल्या बसल्याच कैलासवासी झाले. देहावसान होण्यापूर्वी त्यांनी आपल्या पुत्राला आपला निधनकाल सांगून ठेविला होता, असे म्हणतात.

### मामलेदार आजोबा अमृतराव–तात्या

अप्पांचे वडील चिरंजीव म्हणजे **स्वतःचे** सख्खे आजे अमृतरावतात्या, हे सुरू इंग्रजीत प्रथम करकंबहून नगर जिल्ह्यात नोकरीकरिता गेले. तेथे ते शिरस्तेदार

होऊन पुढे मामलेदार झाले, व नगर जिल्ह्यातून पुणे जिल्ह्यात आले. पुण्यास व आंबेगावास पुष्कळ वर्षे मामलत केल्यावर पाबळ तालुक्यात त्यांची बदली झाली, व तेथेच त्यांनी पेन्शन घेतले. तात्यांना आमच्या मामंजीसुद्धा चार पुत्र होते. वडील बळवंतरावदादा, दुसरे गोविंदरावभाऊ, तिसरे गोपाळराव आने व चवथे विष्णुपंतअण्णा. या चौघांपैकी गोविंदराव व विष्णुपंत प्रथम निफाडास नोकरीवर असून पुढे सन १८४१-४२ त कोल्हापुरास जबाबनिशीच्या कामावर आले, व दुसरे दोघे तात्यांजवळ पाबळासच राहिले. तात्या हे आपल्या वडिलांप्रमाणेच बांध्याने उंच असून अगदी मजबूद होते. हे घोड्यावर बसणारे उत्तम होते. त्यांना संस्कृताची व शास्त्रांची आवड फार असल्यामुळे त्यांचा त्यांनी चांगला अभ्यास केला होता. पुष्कळ संस्कृत ग्रंथ वाचून त्यांनी आपल्या हाताने कित्येक पोथ्यांच्या प्रती लिहून काढलेल्या आहेत. पुरुषसूक्तावर यांनी टीका व मराठीत अर्थ केला होता आणि छापविण्याकरिता **जवळ** देऊन ठेविला होता. त्याप्रमाणे **स्वतः** तो छापविला होता, असेही ऐकते. तात्या भागवत फार उत्तम सांगत. शिवाय, ज्योतिष उत्तम रीतीने वर्तवीत, पत्रिका पाहात व जातीने करीतही असत.

## मामंजी गोविंदराव व स्वतःचा जन्म

आमचे मामंजी फडनीस असतांना **स्वतः**चा जन्म माघ शुद्ध ६ शके १७६३ म्हणजे ता. १८ जानेवारी सन १८४२ रोज मंगळवार या दिवशी संध्याकाळी झाला. ती वेळ तात्यांनी टिपून ठेवून आपल्या हातानी **स्वतःची** पत्रिका विस्तृत लिहून ठेविली आहे.

तात्यांनी अशा रीतीने पूर्ववयातील तसाच उत्तरवयातील आपला आयुष्यक्रम उत्तम ठेवून आपल्या वयाच्या ऐंशीवे वर्षी म्हणजे सन १८६८ साली कोल्हापुरास आमच्या मामंजीजवळ येऊन आपली आयुष्ययात्रा संपविली. मामंजी कोल्हापुरास आल्यावर काही दिवस जबाबनिशीचे कामावर होते. पुढे तेथेच ते मामलेदार झाले. भूधरगड, पन्हाळा, गडहिंग्लज, वगैरे निरनिराळ्या पेट्यांत मामलतीचे काम केल्यावर पुनः त्यांची बदली कोल्हापुरास होऊन, ते सन १८६२/६३ साली खासगी कारभाऱ्याच्या जागेवर कायमचे नेमले गेले. या वेळी त्यांस अडीचशे रुपये पगार मिळत असे.

सन १८४२ साली ते करवीराकडे सडेच आले होते, बरोबर मुलेमाणसे आणिली नव्हती; आमच्या सासूबाई पुढे तीनचार वर्षे वन्संचा (दुर्गा

आक्कांचा) जन्म होईपर्यंत निफाडास आजेसासूबाईच्या जवळ राहिल्या होत्या. वन्संचा जन्म झाला, तेव्हा **स्वत**ःचे वय अडीच वर्षाचे होते. आंबेगावास तात्या अजून मामलेदारीवरच होते, त्यांच्याजवळ चारआठ दिवस राहून मग पुढे मामंजींच्याकडे, कोल्हापुरी जाण्याकरिता आमच्या सासूबाई **स्वत**ःला व वन्संना घेऊन बैलगाडीतून निघाल्या. या प्रवासात **स्वतःवरचे** एक संकट ईश्वकृपेने टळले. ती हकीकत अशीः

## बैलगाडीचा रात्रीचा प्रवास

सासूबाई प्रथम निफाडाहून निघून आंबेगावी येतेवेळी त्यांच्याबरोबर आंबेगावाहून बोलवावयास आलेला एक शिपाई व **स्वतःचे** चुलत चुलते विठ्ठल बाबाजी रानडे असे दोघे बरोबर होते. विठूकाका घोड्यावर बसून गाडीच्या मागे येत होते. दिवस उन्हाळे असल्यामुळे संध्याकाळी शिळोप्याच्या वेळी गाडी जुंपून रात्रभर चालवीत असत. हे दिवस काळोख्या रात्रीचे होते. रात्री दोन वाजण्याच्या सुमारास गाडीतील सर्व माणसे (सासूबाई व दोन्ही मुले) गाढ झोपी गेली होती. तान्ही मुलगी पोटाशी घेऊन सासूबाई निजल्या होत्या व वन्संचे पलीकडे वेगळे पांघरूण घालून **स्वतःला** निजविले होते. वेळ थंड असून वारा गार सुटल्यामुळे गाडीबरोबर चालणारा शिपाई या वेळी पुढील बाजूला गाडीवाल्याच्या शेजारी जाऊन बसला; नंतर थोड्या वेळाने गाडीवाला व शिपाई दोघेही पेंगू लागले बैल रेंगाळतच चालले होते, व विठूकाका बरेच मागे राहिले होते.

## 'विठूकाका, मी येथे पडलो आहे !'

अशा वेळी एक मोठी ओरंगळ आली, व तीतून बैल जोराने गाडी घेऊन निघून गेले. या वेळी **स्वत**ः झोपेत लोळून गाडीच्या अगदी कडेला आल्यामुळे गाडी ओरंगळीला लागताक्षणी, जोराने लागलेल्या धक्क्याबरोबर पांघरूणासकट **स्वतःचे** मुटकुळे रस्त्यावर पडले. सासूबाईंना गाढ झोप लागली होती; पण गाडी धावणीला लागल्याबरोबर शिपाई व गाडीवाला जागे झाले, तरी गाडी धावण्याच्या आवाजात मागे काही पडल्याचे त्यांना कळले नाही. तशीच गाडी मैल दीड मैल पुढे निघून गेली. मग मागून अर्ध्या पाऊण तासाने **स्वत**ः विठूकाकांच्या घोड्याच्या टापांचा आवाज ऐकून ''विठूकाका'' अशी हाक मारून ''मी येथे पडलो आहे'' असे सांगितले. ती हाक ऐकल्याबरोबर विठूकाकांनी **स्वतःला** उचलून पोटाशी घेतले, व गारठलेले अंग पांघरूणात गुंडाळून पोटाशी घट्ट धरून ते घोड्यावर

बसले व सासूबाईंच्या गाडीजवळ येताच सासूबाईंना म्हणाले ''गोपिकावहिनी, जाग्या आहातना? मुलांना पांघरूण नीट आहेना?''

### परमेश्वराची खैर

त्यांनी निजल्याच ''हो, सर्व नीट आहे,'' म्हणून सांगितले.

त्याबरोबर विठूकाकांनी पुन्हा विचारले, ''तुम्ही अजून झोपेतच आहा. दोन्ही मुले तुमच्याजवळ आहेतना? नीट पहा.''

इतके म्हटल्यावर त्या चपापून जाग्या झाल्या, व गाडीमध्ये चोहोंकडे चाचपू लागल्या, तो वन्संशिवाय दुसरे कोणी नाही, हे लक्षात आल्यावर त्या अतिशय भिऊन रडू लागल्या, तेव्हा विठूकाकांनी **स्वतःला** पांघरूणातून काढून सासूबाईंकडे दिले व म्हटले ''आज परमेश्वराने केवढी खैर केली बरे?''

ही गोष्ट विठूकाकांच्या तोंडून मला कळली. अजूनही ही गोष्ट सांगतेवेळी ते गहिवरून येत असत.

### कोल्हापूरात दहा वर्षे वास्तव्य

याप्रमाणे आंबेगावांस आल्यावर काही दिवस तेथे राहून, मग सासूबाई उभयता मुले घेऊन कोल्हापुरास मामंजींकडे आल्या. **स्वतःचे** तीन वर्षांपासून तेरा वर्षांपर्यंत बहुतेक लहानपणी कोल्हापुरासच गेले. वयाच्या सहाव्या सातव्या वर्षी **स्वतःला** पांडोबातात्या दिवेकर यांच्या मराठी शाळेत घातले. या वेळच्या **स्वतःच्या** स्वभावाची व अभ्यासाची सर्व माहिती ताईसासूबाईच्या वेळोवेळच्या बोलण्यात आलेली, त्यांच्याच शब्दात देत आहे, म्हणजे लहानपणी **स्वतःचे** स्वभाववळण कसे होते याची माहिती सहज होईल. ताईसासूबाई एखादे वेळी रागावल्या म्हणजे **स्वतःला** लहानपणींच्या या गोष्टी सांगतः-

### दुर्गा-अक्कांच्या गोष्टी

''आम्ही कोल्हापुरी सरकारी कोठीत राहात असताना कीर्तने माडीवर व आम्ही खाली राहात असू. दोन्ही घरात खटला मोठा. आमच्या घरात मोठी माणसे जास्त व मुले कमी व कीर्तन्यांच्या घरी तर मुलगे व मुली पुष्कळ. त्यामुळे आमच्या दोन्ही बिऱ्हाडांतील माणसांनी एवढा मोठा कोठीचा वाडा पण अगदी गजबजलेला असे. कीर्तने कऱ्हाडे व आम्ही कोकणस्थ हे कोणाला विचारल्यावाचून कळावयाचे नाही. दोन्ही घरची आम्ही सर्व लहानमोठी माणसे व मुले एक घरातील व नात्याने सख्खी असल्यासारखी वागत होतो. आमच्या भाऊसाहेबांच्या

व आबासाहेब कीर्तन्यांच्यामध्ये भेदाभेद मुळीच नव्हता. तोच ठसा इतर सर्व लहानमोठ्या माणसांच्या वागणुकीत दिसे. आमच्या दोन्ही बिऱ्हाडांपैकी कोणाच्या घरी काही असले की, सगळी माणसे तिकडे जावयाची. दुसरी चूल पेटावयाची नाही. प्रत्येक सणाला ''आम्ही हा सण करणार' म्हणून भांडण असावयाचे. मग पुढे अशी तोड काढिली की, कुलधर्म असतील तेवढे वेगळे करावेत. बाकीचे सण निमे निमे वाटून दोन्ही घरांत आळीपाळीने करावेत. त्याप्रमाणे आम्ही करीत असू.

## कसली हौसच नाही!

कीर्तन्यांची मुले लहानपणापासून हुशार व तरतरीत; पण आमचा मुलगा फार थंड व धिमा, याला काही समजत नसे. धड निरोपही सांगता यावयाचा नाही. शाळेत परीक्षा झाली म्हणजे ती मुले ''आम्ही पास झालो, आम्हाला परीक्षक असे असे म्हणाले' वगैरे कितीतरी घरी येऊन सांगत; पण याचे काही नाही. आपण होऊन ''मी पास झालो' असेसुद्धा सांगावयाचा नाही. कीर्तन्यांच्या मुलाकडून हा पास झालेला कळले म्हणजे मी विचारी ''अरे माधवा, तू पास झालास हे आम्हाला नाही कुठे सांगितलेस? कसली हौसच नाही! तो विनायक पहा किती हुशार आहे तो.' तेव्हा हा म्हणावयाचा, की, ''त्यात काय सांगावयाचे आहे? रोज शाळेत जाऊन आम्ही अभ्यास करतो तर पास होणारच; त्यात काय जास्त आहे?' असे म्हणून मुकाट्याने जावयाचा.

## माधवापेक्षा दुर्गाचेच कौतुक

''आईने तर नित्य काळजी करावी, की, या माधवाचे कसे होईल. हा दहा रुपये मिळवून आपल्या बायकोचे पोट भरण्याइतका शहाणा होईल का? असे त्या मला नेहमी म्हणत.'' तीच दुर्गा पहा! उलट अतिशय बोलकी, हुशार व तरतरीत असे. ती अजूनही तशीच आहे. बापाच्या व भावाच्या लाडाने व हुशार म्हणण्याने फार कजाग मात्र झालेली आहे, व आता तर त्या अक्कासाहेब झाल्यापासून माधवापेक्षाही शहाण्या झाल्या आहेत. लहानपणापासून ही अशी आतताई असून ज्या त्या बोलण्यात आपली छाप वर ठेवावयाची व हा आपला शुद्ध नंदी एकनादी व सरळ. डावपेच काही माहीत नाहीत व ते समजावयाचेही नाही. एकदा एका गोष्टीला आरंभ केला, की, ती आपली न चुकता नेमाने करावयाचीच, त्याबद्दल पुनः सांगावे लागत नसे. पण त्यात कोणी अडथळा केला, की, हट्ट धरून रडत बसावयाचा. मग समजूत लवकर व्हावयाची नाही.